# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/उद्यान/ 539 /2024-25 दिनांक :-29/10/2024

**// जाहीर नोटीस सुचना //**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहीर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | भाईंदर (प.) राई गाव, राई राम मंदिर येथिल श्री. अभय दत्तात्रेय पाटील | 01 नग शेवगा | सदरचे झाड श्री. अभय दत्तात्रेय पाटील यांच्या खाजगी जागेत वाढलेले असून रहदारीच्या रस्त्याच्या दिशेने झुकलेले आहे. सदरचा रस्त्या रहदारीच्या असुन नागरिकांना ये-जा करण्यास अडचण निर्माण होत आहे. जोराच्या वा-याने झाड पडून जिवित व वित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| 2 | भाईंदर (पू.) नवघर पोलीस ठाणे येथिल वरिष्ठ पोलिस निरिक्षक | 01 नग स्पॅथोडिया | सदरचे झाड नवघर पोलीस स्टेशनच्या आवारात उंच वाढलेले असून सदरचे झाड पोलिस स्टेशनच्या आवारात शेडच्या बांधकामात अडथळा निर्माण करत आहे. या कारणास्तव सदरचे झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त (उदयान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

28/10/24

(कांचन गायकवाड)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner